PFMS प्रणालीद्वारे वितरीत करण्यात येत असलेले निधी वितरण व सनियंत्रणाची जबाबदारी निश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
शासन शुध्दीपत्रक क्रमांक: प्रआयो-२०१७/प्र.क्र.२३९/योजना-१०
बांधकाम भवन, तळ मजला,
२५, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-०१.
तारीख: २३ ऑगस्ट, २०१९.

**वाचा :-**

**१) शासन परिपत्रक क्रमांकः प्रआयो-२०१७/प्र.क्र.२३९/योजना-१०, दि. १४.०८.२०१७.**

**२) शासन पत्र क्रमांकः जिग्राप्र-२०१९/प्र.क्र.३०/योजना-५, दि. १९.०७.२०१९**

**प्रस्तावना :-**

राज्यात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण तसेच, राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांचे अर्थसहाय्य PFMS प्रणालीद्वारे थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येते. यासाठी निधी वितरण व सनियंत्रणाचे स्तर संदर्भाधिन क्र. १ येथील परिपत्रकान्वये निश्चित करण्यात आले आहेत. तथापि, संदर्भाधिन क्र. २ येथील पत्रान्वये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांमधील पदांचा सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला आहे. त्यामुळे ग्रामीण घरकुल योजनांच्या जिल्हा स्तरावरील प्रशासकीय निधीच्या खात्यातून वितरीत करण्यात येणाऱ्या निधीसाठी व सनियंत्रणासाठी सुधारित स्तर निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

## शासन शुध्दीपत्रक:-

संदर्भाधिन क्र. १ येथील परिपत्रकामधील परिच्छेद ब पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

(ब) जिल्हा स्तरावरील प्रशासकीय निधीच्या खात्यामधून वितरीत केलेल्या निधीसाठी व सनियंत्रणासाठी संबंधित प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व संबंधित सहाय्यक लेखाधिकारी जबाबदार असतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२३१५२६२७३९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Hemant Sudhakar Pathak

Digitally signed by Hemant Sudhakar Pathak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1a58924bb1ebc2ed6699e048bfa42ad41d1ed32de1e3eda84d0c03040473905e, cn=Hemant Sudhakar Pathak
Date: 2019.08.23 16:43:07 +05'30'

**(हे.सु.पाठक)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा, अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)

२) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, बेलापूर, नवी मुंबई.

३) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा , जिल्हा परिषद, सर्व.

४) निवड नस्ती (योजना-१०).